Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri



આપે ગુરુજી

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri



CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

२८८८-८

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

साने गुरुजी

(सुलभ जीवन परिचय)



शीलभद्र
CHECKED 1973
स्टाक प्रमाणीकरण १९८४-१९८५

ता. ११ जुलै १९५०

किंमत ६ आणे

चित्रशाळा प्रकाशन, पुणें २

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

: मुद्रक व प्रकाशक :
दा. त्र्यं. जोशी, बी. ए. (टिळक)
चित्रशाळा प्रेस,
१०२६ सदाशिव पेठ, पुणें २

☆

प्रथमावृत्ति
११ जुलै १९५०

☆

सर्व हक्क प्रकाशकाधीन

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

अं ज लि

पू. साने गुरुजींच्या प्रथम मासिक स्मृतिदिनीं हा त्यांच्या जीवनाचा छोटेखानी परिचय प्रसिद्ध होत आहे. त्यांचा मृत्यु जसा अकल्पित तसा तो अकस्मिकच ! 'मी जेव्हां रडत होतों, त्या वेळीं सर्वजण हसत होते; आणि मी जेव्हां हसत होतों, तेव्हां सर्वजण रडत होते,'' असें जीवनमरणाचें वर्णन कोणाला यथार्थतेनें लागूं असलें तर तें साने गुरुजींनाच. मृत्यु हें एक स्थित्यंतर आहे. तो भयाण नसून, प्रेमळ आहे अशी त्यांची मृत्यूबद्दल उदात्त भावना होती. त्यांनीं आपल्या जीवनाचा प्रश्न सोडविला, पण अनेकांना दुःख दिलें.

गुरुजींचें अगदीं थोडक्यांत पण यथार्थ वर्णन करावयाचें म्हणजे 'भावना' ही गुरुजींच्या रूपानें पृथ्वीवर मनुष्यरूपानें वावरत होती असेंच म्हणावें लागेल. भावना ही शुद्ध असते, प्रेमळ असते, ती हंसते, रडते, प्रसंगीं क्रुद्धहि होते. भावनेचें प्रेम असामान्य असतें, तसेंच तिचा क्रोधहि असामान्य असतो. भावनेला तडजोड माहीत नसते. भावना खचली म्हणजे निराशा उत्पन्न होते, आणि मग भावनामय असा माणूस वैतागून अशा जगांत जाऊं इच्छितो कीं जेथें प्रेम, स्नेह, दया, कारुण्य यांचें साम्राज्य असतें !

गुरुजींचा जन्म गरिबींतच झाला, ते गरिबींत वाढले आणि त्यांचा अंतहि गरिबींतच झाला. पण अनेक उच्च संस्कारांनीं नटलेलें व टवटवलेलें असें आपलें जीवनपुष्प त्यांनीं मायभूमीच्या चरणीं अर्पण केलें. मांगल्याची आणि माणुसकीची पूजा आणि अखंड सेवाव्रत हेंच त्यांच्या जीवनाचे स्थायीभाव होते.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

गुरुजींच्या जीवनापैकीं पुष्कळसा काळ बालगोपाळांच्यासाठींच गेला. त्यांनीं आपल्या लिखाणानें जर कोणाचें जीवन घडविलें असेल तर तें आमच्या विद्यार्थ्यांचें. या बालगोपाळांच्या संगतींत ते स्वतःलाहि विसरत. त्यांनीं या बालसृष्टीला हसविलें, रडविलें, संस्कृतिसंपन्न व शीलसंपन्न केलें! त्यांचें हें कार्य इतकें मोठें आहे कीं–त्यांची देशसेवा मोठी, साहित्यसेवा मोठी, कीं ही त्यांची बालगोपाळांची सेवा मोठी ह्याचा संभ्रम पडतो. आणि म्हणूनच त्यांच्या अकाली निधनामुळें पर्यायानें साऱ्या राष्ट्राचें नुकसान झालें आहे हें खरें असलें तरी आपल्या महाराष्ट्राच्या बाल-जीवनाचें जें नुकसान झालें आहे त्याला तोड नाहीं असेंच म्हणावें लागेल.

—प्रकाशक

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

साने गुरुजी

लोकमान्य टिळक आणि महात्मा गांधी यांच्या निर्याणानंतर साऱ्या महाराष्ट्राच्या हृदयाला हादरा देणारा प्रसंग ११ जून १९५० ह्या दिवशीं घडला. नागपूरपासून गोव्यापर्यंतच्या महाराष्ट्रीय जनतेच्या हृदयाला ह्या दिवशीं एक चरका बसला. महाराष्ट्रांत अशी एकहि सहृदय व्यक्ति नाहीं कीं जिचें हृदय त्या दिवशीं रडलें नाहीं. सुशिक्षित रडले, अशिक्षित रडले. स्त्रिया रडल्या, पुरुष रडले. मुलें रडलीं, मुली रडल्या. साहित्यिक रडले, राजकीय नेत्यांचे डोळे पाणावले. साहित्यिकांना वाटलें कीं ज्ञानेश्वर तुकारामांच्या श्रेणींतला एक कवि आज अंतर्धान पावला. राजकीय नेत्यांना वाटलें कीं समाजाची मांगल्यनिष्ठा कायम ठेवणारी एक शक्ति नाहींशी झाली. स्त्रियांना वाटलें कीं महाराष्ट्रीय समाजांतील एकमेव मातृहृदयी व्यक्ति नाहींशी झाली. हरिजनांना वाटलें कीं आपल्यासाठीं आपले प्राणहि पणाला लावणारा आपला हितकर्ता गेला. मुलामुलींना आपली माता गेल्याचें दुःख झालें. आतां त्यांना गोष्टी कोण सांगेल? त्यांच्या जीवनांत भारतीयता यावी, समतेची ज्योत प्रज्ज्वलित व्हावी, त्यागाचे-वैराग्याचे उपासक त्यांनीं बनावें म्हणून आतां कोण त्यांना उद्‌बोधन करील? त्यांच्या सुखदुःखांशीं कोण समरस होईल? अडीअडचणींला

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

त्यांनीं आपलें हृदय आतां कोणापाशीं खुलें करावें ? महाराष्ट्रांतील मांगल्याचा नंदादीप त्या दिवशीं मालवला आणि चोहोंकडे अंधारच अंधार झाला. पण अंधारहि दिसूं शकतो, अंधारांतहि एकप्रकारचें गहन गंभीर सामर्थ्य असतें. महाराष्ट्राच्या हृदयावर गेलीं दोन तपें ज्या लेखणीनें आणि वाणीनें संस्कार केले, ज्या हृदयाला आकार देण्याचा प्रयत्न केला ती लेखणी आणि वाणी यांनीं त्या दिवशीं महाराष्ट्राला सत्याग्रहाचा, लोकशाहीचा व समाजवादाचा अखेरचा संदेश देऊन विराम घेतला. ज्या आत्म्यांतील लाटांनीं महाराष्ट्राचें जीवन संपन्न केलें, परिपुष्ट केलें. त्या आत्म्याचें व्यक्त-स्वरूप त्या दिवशीं निचेष्ट झालें. परंतु तो आत्मा महाबलवान्, निर्भय, निर्मम, निरहंकार असा होता. त्या आत्म्यानें आपलें आत्मत्व अनुभवलें होतें. "पाणी न भिजवी यास, यांस वारा न वाळवी" असा तो आत्मा आपल्या स्वत्वाची जाणीव अखंड बाळगणारा होता. मृत्यूचें काव्य गाणारा तो आत्मा होता. जुनीं वस्त्रें जितक्या लीलेनें माणूस फेंकतो व नवीं घेतो तितक्याच लीलेनें देहवस्त्र फेंकणारा तो आत्मा होता. गीतेनें जीवनाचे तीन मुख्य सिद्धांत सांगितले आहेत. आत्म्याची अमरता, देहाची क्षुद्रता व स्वधर्माची अबाध्यता. या तीन जीवनसिद्धांतांचें अखंड भान राखणाऱ्या त्या आत्म्यानें जितक्या लीलेनें मनुष्य झोंपी जातो तितक्याच लीलेनें आपलें मस्तक मृत्युदेवाच्या मांडीवर ठेवलें. भारतीय संस्कृतींतील मृत्यूची कल्पना पचविलेला तो आत्मा होता. जन्मोजन्मीं या भारतीय संस्कृतीचा उपासक होण्याची इच्छा धरणारा तो आत्मा होता. जीवनाइतकेंच मृत्यूलाहि परम मंगल मानणारा हा आत्मा होता. त्या आत्म्याचें आतां व्यक्त-स्वरूपांत दर्शन होणार

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

नाहीं. मानवाच्या नाशिवंत शरिरावर मानव मनानें विजय मिळविला आहे. मानवाचें नाशिवंत शरीर नष्ट झालें तरी स्मृतिरूपानें मनुष्य ज्या शरीरांत मानव आत्मा प्रकट झाला त्याला अमर करीत असतो. ही स्मृतिहि जितकी तीव्र असेल तितकी प्रेरक बनते, स्फूर्तिदायी बनते. हा महाराष्ट्राच्या आतांपर्यंतचा थोरवीचा वारसा घेऊन आलेला आत्मा आज साने गुरुजींच्या स्वरूपांत व्यक्त नसला तरी तो स्मृति-रूपानें महाराष्ट्राच्या हृदयांत चिरकाल वास करील व महाराष्ट्र-जीव-नाचें रक्षण करील. गुरुजींचें हृदय मातेचें होतें. त्यांची मातृभावना व्यापक आणि तीव्र असल्यानेंच ते साऱ्या महाराष्ट्राची माउली बनूं शकले. ज्ञानेश्वरांच्या नंतर महाराष्ट्र-जीवन परिपुष्ट करणारी माउली त्याला अनेक शतकांनीं मिळाली होती. मातेचें शरीर गेलें तरी तिचें प्रेम अमर असतें आणि आपल्या पुत्रांचें रक्षण करीत असतें. त्या एका माउलीची गोष्ट आहे ना ? तिच्या एका मुलानें अविचारानें आईला मारून काळीज काढलें आणि जिन्यावरून उतरतांना त्याला ठेंच लागली. तें मातेचें काळीज म्हणालें " बाळ, जरा जपून हं. " शरीर सोडल्यानंतरहि आपल्या अपत्यांचें रक्षण करण्याची ही ताकत मातृहृदयांत असते. गुरुजी मातेचें हृदय घेऊन आले होते. त्यांचा आत्माहि ह्या महाराष्ट्र-बालकाला ठेंच लागूं नये, त्याचे पाऊल चुकूं नये म्हणून अखंड जागृत राहील.

जन्म व बालपण

महाराष्ट्राची ही पूंजीभूत पुण्याई, महाराष्ट्राची संचित थोरवी ज्या मानवरूपांत प्रकट झाली तें स्वरूप ह्या महाराष्ट्राला ज्या भागानें अनेक थोर पुरुष दिले त्या कोंकणांत प्रकट झालें. २४ डिसेंबर १८९९

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

रोजीं सान्यांच्या कुळांत पांडुरंगाचा जन्म पालगड येथें झाला. वडील वडवलीचे खोत होते, पण नांवाचेच. खोतीचें वैभव कधींच त्यांच्या सहृदयतेनें त्यांना लाभू दिलें नव्हतें. त्यांच्या सहृदयतेनें त्यांना गरिबांच्या पातळीवर आणून ठेवलें होतें. गुरुजींची माता अत्यंत प्रेममय व भावनामय माउली होती. गुरुजींच्या जीवनांत जे जे सद्गुण प्रकट झाले त्यांचीं बीजें ह्या मातापित्यांनीं त्यांच्या बालपणींच पेरून ठेवलीं होतीं. आपलीं मुलें सत्यनिष्ठ, सहृदय निघावींत; त्यांना अहंकार असूं नये; तीं विद्याविनयसंपन्न असावींत; त्यागी असावींत; आसपासच्या जीवांशीं समरस होणारीं असावींत; आसपासच्या सृष्टीशींहि एकरूपता अनुभवणारीं, स्वाभिमानी असावींत; श्रमाचा तिटकारा न करणारीं असावींत; कोणत्याहि कामाला तुच्छ मानणारीं नसावींत ह्यासाठीं ती माउली खटपट करी. आपल्या मुलांनीं कोणाला तुच्छ, हीन मानूं नये; दुसऱ्यांच्या भावनांची कदर करावी असें ही माता लहानसहान प्रसंगांतून आपल्या मुलांच्या मनांवर बिंबवीत असे. माता हा पहिला गुरु म्हणतात. ह्या मुलाचा माता हा पहिला गुरु होता. त्या मातेनें ह्या बाळाला अक्षरें शिकविलीं नसतील, मोठमोठे ग्रंथ वाचावयास शिकविलें नसेल; गणित, हिशेब शिकविले नसतील. परंतु शिक्षणाचा खरा अर्थ लिहिणें वाचणें हा नव्हे, थोडें पाठ केलेलें लक्षांत ठेऊन पाठ म्हणून दाखविणें नव्हे. शिक्षण म्हणजे संस्कार. ही संस्कारांची संपत्ति ज्याला लाभली तो सुशिक्षित. त्या माउलीनें ह्या बाळाला ही संस्कार–संपदा विपुल प्रमाणांत दिली. मानवतेच्या उपासनेची गोडी तिनें निर्माण केली. तिनें स्वतःच्या जीवन-ग्रंथांतून अनेक संस्कारांचे पाठ ह्या बाळाला दिले. परंतु हें

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

घरगुती शिक्षण किती पुरणार ? तें तर अखंड चालावयाचेंच असतें. पण लौकिक शिक्षणहि मुलाला देणें जरूर होतें.

पांडुरंगाला घरीं अण्णा म्हणत, पंढरीहि म्हणत. पंढरी अत्यंत मातृभक्त होता. माता हें त्याचें दैवत होतें. मराठी शिक्षण पालगड ह्या आपल्या जन्म-गांवांत मातेच्या छायेंतच घेतल्यावर पुढच्या शिक्षणाचा प्रश्न निघाला. पुण्याला मामांकडे कांहीं दिवस हा बाळ राहिला. पण मातेच्या मायेच्या छायेंत वाढलेल्या मातृभक्त बालकाला तेथें राहणें जड गेलें. तेथून तो परत आला. नंतर जवळच्या दापोलीच्या मिशनच्या इंग्रजी शाळेंत तो जाऊं लागला. दापोलीलाच राहावें लागे. परंतु सुट्टीच्या दिवशीं मातेचें दर्शन घेऊन व मातृप्रेमामृताचें प्राशन करून यावें व त्या उबेवर आठवडा काढावा अशाप्रकारें शिक्षण चालूं होतें. पण दिवसेंदिवस घरची स्थिति खराब होत होती. आर्थिक हलाखी येत होती. मोठ्या मुलानें नोकरी धरली होती. इंग्रजी पांचवीपर्यंत तर शिक्षणाची मजल गांठली गेली. परंतु पुढें रेटणें कठिण झालें. रेल्वेंत नोकरी करावी म्हणून सुचविण्यांत आलें. परंतु शिक्षणाची लागलेली गोडी नोकरीच्या आड येत होती. शेवटीं पुण्याला किंवा अन्यत्र जाऊन मधुकरी मागून शिक्षण घ्यायचें ठरलें. प्रथम औंधला कांहीं दिवस घालवले. तेथें अन्नछत्रांत मोफत जेवणखाण कसें का होईना मिळत असे. पुढें प्लेगमुळें पुण्याला जावें लागलें. पुण्याला वारानें जेवून नूतन मराठी विद्यालयांत शिक्षण सुरू झालें. वारानें जेवणाऱ्या विद्यार्थ्याच्या जीवनाची कल्पना सुखवस्तूंना येणार नाहीं. कधीं कधीं वारहि नसत. मग देवळांत जाऊन बसावें. ज्या मित्राकडे राहात त्यांना उपाशी असल्याचें कळूं

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

देऊं नये, त्यांच्याकडे राहावें पण अधिक भार त्यांच्यावर नको ही वृत्ति. कधीं कधीं बाजारांत जी भाजी स्वस्त मिळेल तिनें पोट भरावें, कधीं गोवारीच्या शेंगा खाऊनच दिवस काढावेत, मात्र आपलें अध्ययन मागें पडूं देऊं नये असें खडतर जीवन चाललें होतें. "सुखार्थिनः कुतो विद्या, विद्यार्थिनः कुतः सुखम्" अशी ही कठोर साधना होती. परंतु शाळेंत मात्र हा विद्यार्थी चमके. शिक्षकांनाहि ह्या विद्यार्थ्याचे गुण दिसत. प्रा. पोतदार तेव्हां शिक्षक होते. ह्या विद्यार्थ्याच्या उत्तर-पत्रिका वाचून ते खूष होत. त्यानीं त्यांतली एक उत्तर-पत्रिका अजून जतन करून ठेवली आहे. भाषाविषयाची ह्या विद्यार्थ्याला गोडी असे. संस्कृत फार आवडे आणि त्यांत गतिहि चांगली असे. १९१८ सालीं मॅट्रिकची परीक्षा तर पास झाला. पुढें काय ?

कॉलेज-शिक्षण

त्या वेळीं न्यू पूना कॉलेज होतें. पुढें एस्. पी. कॉलेज झालें. न्यू पूना कॉलेजमध्यें हा विद्यार्थी दाखल झाला. कॉलेज म्हणजे विश्वविद्यालय. साऱ्या विश्वांतल्या ज्ञानाशीं, विद्यांशीं तेथें परिचय व्हावयाचा. परंतु विश्वविद्यालयाचा हा अर्थ किती विद्यार्थ्यांच्या ध्यानांत येतो ? परंतु हा विद्यार्थी विद्येसाठीं, ज्ञानासाठीं तळमळत असे. एकहि क्षण वाया जाऊं नये म्हणून धडपडत असे. साऱ्यांना शोधायचें असेल तर केव्हांहि वाचनालयांत जावें अशी प्रसिद्धि तेव्हां होती. हल्लीं विद्यापीठानें लावलेलीं पुस्तकेंहि कोणी वाचीत नाहीं. मार्गदर्शिका, गाईड यावरून अभ्यास होतो. चावून चावून भरवावें

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

तसें तयार ज्ञान मिळतें. पण सान्यांनीं वर्गांत शिकविलेल्या विषयाशीं संबंध असलेलें एकहि पुस्तक वाचावयाचें सोडूं नये. पुढें बी. ए. च्या वेळीं एक नवाच प्रश्न उभा राहिला. कोणते विषय बी. ए. ला घ्यायचे ? त्याच वर्षी विद्यापीठानें मराठी विषय घेऊन बी. ए. होण्याची सोय केली होती. पण सारे हुशार विद्यार्थी संस्कृतकडे जात. सान्यांचें संस्कृत चांगलें असे. संस्कृतांतलें त्यानीं खूप वाचलें होतें. संस्कृत भाषेवरहि चांगला अधिकार होता. तिकडे जाऊन कांहीं फायदाहि होण्याचा संभव होता. पण सान्यांनीं आपल्या मातृभाषेचा अभ्यासच करावयाचा निश्चय केला. त्यानीं मराठी व संस्कृत हे विषय बी. ए. ला घ्यावयाचें ठरविलें. त्यांना पोतदार शिकवायला होते. ह्या हुशार विद्यार्थ्याला पाहून त्यांना हुरूप चढला. वासराला पाहून गाईला पान्हा फुटावा त्याप्रमाणें पोतदारांचें झालें. पोतदारांना शिकवायला उत्साह वाटूं लागला. पण त्या वेळीं मराठींत पुस्तकेंहि बी. ए. ला शिकविण्याच्या योग्यतेचीं नव्हतीं. विद्यार्थ्यांचें नुकसान होऊं नये म्हणून व मुख्यतः हुशार सानेचें नुकसान होऊं नये म्हणून पोतदारांनीं 'इंग्रजी गद्याचा मराठी अवतार' हें पुस्तक लिहिलें. त्यांना प्रा. रा. कृ. लागू इंग्रजी शिकवीत. तेहि या विद्यार्थ्यावर खूष असत. आणि साने बी. ए. पास झाले. पुढें एम्. ए. ची परीक्षाहि ते उत्तीर्ण झाले.

अमळनेरला

पुढें काय हा प्रश्न होताच. आपल्या आईला सुखवावें म्हणून उत्साहानें ते शिकत. पण आई मॅट्रिक होण्यापूर्वी अचानक सोडून गेली. वडीलहि सोडून गेले. त्यांच्या जीवनांतली

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

स्फूर्तिच जणूं गेली. पण मातेची स्मृतिहि त्यांना स्वस्थ बसूं देईना. तें पार्थिव शरीर म्हणजेच का फक्त माता ? नाहीं. ह्या देशांत आणखी किती तरी माता आहेत. त्या माताहि माझ्याच हें अद्वैत त्यांच्या आईच्या शिकवणींतूनच त्यांना मिळालें होतें. आणि आईच्या पार्थिव शरिराच्या सेवेपेक्षांहि "आई" ह्या भावनेची पूजा श्रेष्ठ आहे हें ओळखून त्यानीं आपलें शिक्षण पुढें चालविलें. शिक्षण संपलें. पण त्या शिक्षणामुळें त्यांना आपल्या संस्कृतीचा, तत्त्वज्ञानाचा अभ्यास करावा असें वाटूं लागलें. त्यांचें लक्ष अमळनेरच्या तत्त्वज्ञान-मंदिराकडे गेलें. पदवीधर विद्यार्थ्यांना तेथें घेत. हिंदुस्थानांतील नाना प्रांतांतून पदवीधर तेथें येत. त्यांच्या निर्वाहाची व्यवस्था तेथें होई. तेथें एक वाचनालय होतें. येणाऱ्यांना राहावयासाठीं सुंदर प्रशस्त खोल्या होत्या. साने तत्त्वज्ञानमंदिरांत रमले. नाना ग्रंथांचें अवलोकन करावें, वेगवेगळ्या प्रांतांतून आलेल्या पदवीधरांशीं परिचय करून घ्यावा, भारताचें ऐक्य अनुभवावें, हास्यविनोद करावा, आनंदानें कालक्रमणा करावी हा त्यांचा कार्यक्रम असे. पण लौकरच त्यांच्या जीवनांत एक क्रांति झाली.

तत्त्वज्ञानी साने सर झाले

केवळ तत्त्वचिंतन काय कामाचें ? कोरडें तत्त्वज्ञान घेऊन काय करणार असें त्यांना वाटूं लागलें. तत्त्वज्ञान आपल्या जीवनांतून व्यक्त झालें पाहिजे. वाचनालयांत पुस्तकांत तोंड खुपसून बसून राहणारें तत्त्वज्ञान हें निरुपयोगी होय. भारताचें अद्वैत ज्ञान त्यांना आकर्षून घेई. पण हें अद्वैत अनुभवण्यासाठीं त्यांना तळमळ वाटे. अद्वै-

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

ताच्या अभ्यासाच्या इच्छेनें त्यांना तत्त्वज्ञानमंदिरांत आणलें आणि त्या अद्वैताच्या अनुभवाच्या इच्छेनें त्यांना तेथून बाहेर काढलें. साने खानदेश शिक्षण–मंडळाच्या शाळेंत शिक्षक झाले. तत्त्वज्ञानी साने सर झाले. लौकरच ते विद्यार्थ्यांतहि प्रिय होऊं लागले. विषयाशीं तादात्म्य पावण्याची त्यांची शक्ति अलौकिक होती. त्यांच्या वृत्तींतल्या तादात्म्यामुळें विद्यार्थीहि समरस होत. अमळनेरच्या शाळेला जोडून एक वसतिगृहहि होतें. साने सरांना तेथले मुख्याध्यापक गोखले यानीं हळू हळू वसतिगृहांत खेंचलें आणि लौकरच ते तेथले मुख्य झाले. विद्यार्थि-जीवनाची बाग फुलविणारे ते माळी झाले. त्यांना आवडीचें काम मिळालें. त्या कामांत ते रंगून जात. आपले विद्यार्थी त्यागी, संयमी, निर्भय, देशप्रेमी, ज्ञानविज्ञानसंपन्न कसे होतील याचा ते सतत विचार करूं लागले. त्यानीं वसतिगृहाचें स्वरूप पालटलें. वसतिगृह पूर्वीच्या गुरुकुलाच्यासारखें बनूं लागलें. विलासप्रिय नवयुवक त्यागी बनूं लागले, साहसप्रिय युवक संयमी बनूं लागले, ध्येयशून्य युवक ध्येयप्रवण बनूं लागले. विद्यार्थ्यांत भेदाभेद राहिले नाहींत. सारे समान झाले. प्रत्यक्ष सेवाकार्य सुरू झालें. सफाई होऊं लागली. एकीकडे बगीचा फुलला. लादलेल्या शिस्तीच्या जागीं आतां जीवनाच्या विकासार्थ आवश्यक म्हणून स्वखुशीनें विद्यार्थी बंधनें पाळूं लागले. स्वावलंबन, बंधुभाव, सेवावृत्ति यांनीं विद्यार्थि–जीवन संपन्न होऊं लागलें. पण शालेय चौकटींतला अभ्यास तो कितीसा पुरणार? शालेय शिक्षणाच्या बाहेर केवढी अफाट ज्ञानराशी पडली होती. पण विद्यार्थ्यांना त्या ज्ञानराशीकडे कोण नेणार? शाळेच्या ठराविक पाठ्यक्रमापलीकडे जायला हवें. प्रार्थनेनंतर वा प्रसंगोपात इतरत्र थोडेफार बोलणें

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

होई. पण तें पुरेसें नसे. विद्यार्थि–जीवनाची फुलबाग फुलविण्यासाठीं समर्थ असे नाना भाव हृदयांत तुडुंब भरलेले असत. जगांतली परिस्थिति या विद्यार्थ्यांना समजली पाहिजे, विचारांच्या ज्या नाना लाटा सर्वत्र उठत आहेत त्यांचा परिचय ह्या विद्यार्थ्यांना हवा, जगाच्या ज्ञानांत भर घालणारांची माहिती विद्यार्थ्यांना हवी, भारताला विज्ञानाची दीक्षा द्यावयाची तर विज्ञानाचीहि गोडी विद्यार्थ्यांना लागली पाहिजे. जगांतल्या थोर पुरुषांचीं जीवन–चरित्रें वाचून विद्यार्थ्यांना प्रेरणा मिळाली पाहिजे. पण हें सारें करावयाचें कसें ? त्यासाठीं नित्याची योजना हवी. सूर्य नित्य उगवतो म्हणून तो जीवनें फुलवूं शकतो. नित्यतेंतून जीवनाला धार येते. नित्याची अशी काय योजना यासाठीं करतां येईल ? हा विचार साने सरांना स्वस्थ बसूं देत नव्हता.

छात्रालय दैनिकाचा जन्म

आणि साने सर आतां निराळ्याच उद्योगाला लागले. वह्याच्या वह्या भरून रामनाम ते लिहूं लागले. हें रामनाम कशाला ? मृत्यूनंतर पुण्य मिळावें म्हणून ? नाहीं. रामनामानें तावच्या ताव भरतांना आपण किती वेळांत किती लिहूं शकतों; अक्षर मोकळें, सरळ, वाटोळें आणि सुवाच्य पण वेगानें कसें लिहितां येईल याचा अभ्यास सुरू होता. आणि एक दिवस छात्रालय दैनिकाचा अंक पहांटेसच विद्यार्थ्यांच्या नजरेला पडला. एकटाकीं सुंदर अक्षरांत लिहिलेला तो अंक पाहून विद्यार्थ्यांना आश्चर्य वाटलें. आनंद झाला. छात्रालय दैनिकावर विद्यार्थ्यांच्या उड्या पडूं लागल्या. त्यांतून नाना विष-

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

यांशीं त्यांचा परिचय होत होता. त्यांची जीवनबाग फुलत, खुलत होती. सद्‌गुणांचीं रोपटीं तेथें वाढत होतीं. त्या दैनिकांत छात्रालय वृत्तहि मधून मधून येई. कोणाचा नामनिर्देश नसला तरी कोण कसें वागतो त्याचें वर्णन येई. कोणी चांगला वागला कीं त्याची पाठ थोपटली जाई. कोणाची चूक झाली त्याला इशारा दिला जाई. विद्यार्थ्यांशीं साने सर एकरूप झाले होते. विद्यार्थी शिक्षक अभेद तेथें होता. तेथें मुलांचें दुखलें खुपलें पाहणारी माता होती. विद्यार्थ्यांचे कंदील काळे झालेले असले तर ते पुसले जात. घाण कपडे धुवून ठेवले जात. विद्यार्थ्यांना अप्रत्यक्षपणें शिक्षण मिळे. एकदां छात्रालयाचा गडी गोपाळ आजारी पडला. साऱ्या मुलांनीं आणि सान्यांनीं त्याची जीवेंभावें सेवा केली. सर्वांभूतीं समभाव तेथें प्रकट होत असे. 'छात्रालय दैनिका'ची शक्ति प्रकट झाली. तत्त्वज्ञान व्यवहारांत येऊं लागलें. असें वाङ्मय महाराष्ट्रांत सर्वत्र जावें. विद्यार्थि-वर्गाचें जीवन तेजस्वी व्हावें असें अनेकांना वाटूं लागलें आणि १९२८ च्या नोव्हेंबरांत 'विद्यार्थी' या नांवाचें मासिक सुरू करण्यांत आलें. विद्यार्थि-जीवन तेजस्वी बनावें, 'तेजस्वी नौ अधीतम् अस्तु" हा मंत्र सार्थ बनावा म्हणून तें मासिक निघूं लागलें.

१९३० चा लढा

'विद्यार्थी' मासिकांतून तेजस्वी विचार सर्वत्र जाऊं लागले. देशप्रेमाचे विचार जाऊं लागले. आणि तिकडे देशांतलें वातावरणहि तापत होतें. गांधीजी आफ्रिकेतून सत्याग्रहाचें शस्त्र घेऊन आले होते. चंपारण्यांत, गुजरातेंत तें शास्त्र अजमावण्यांत आलें होतें.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

 Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

देशाचीं सूत्रें गांधीजी हातांत घेत होते. आणि १९२८ साल आलें. कलकत्त्याला काँग्रेस भरली. मोतीलालजी अध्यक्ष होते. तरुणांचा वृद्धांचा तेथें संग्राम ठाकला. जवाहरलाल मोतीलाल यांच्यांत लढत जुंपली. जुना पक्ष वसाहतीच्या स्वराज्यावर राजी होता. तरुण पक्षाला संपूर्ण स्वातंत्र्याची तहान होती. गांधीजी मध्यें पडले. दोघांना सहमत होईल अशी तडजोड त्यानीं काढली. एक वर्षाचा निर्वाणीचा खलिता काँग्रेसनें ब्रिटिश सरकारला पाठविला. ३१ डिसेंबर १९२९ ला लाहोरला रावी नदीच्या तीरावर काँग्रेसचें अधिवेशन व्हावयाचें होतें. जवाहरलाल अध्यक्ष झाले. तिकडे गांधीजी 'नवजीवन' मधून नव विचारांचा वर्षाव सर्वत्र करीत होते. सर्वत्र चरखा त्यानीं पोंचवला होता. चरख्याच्या धाग्याबरोबर नवीन विचार त्यानीं जोडला. देशांत 'यूथ लीग'ची चळवळ सुरू झाली. सर्वत्र चैतन्य संचरत होतें. अमळनेरच्या शाळेंतहि राष्ट्रीय वातावरण होतें. तेथल्या विद्यार्थि-जीवनांतहि चैतन्य येत होतें. आणि लाहोरला संपूर्ण स्वातंत्र्याचा ठराव पास झाला. लढ्याचे वारे घुमूं लागले. इतिहासप्रसिद्ध 'दांडीयात्रा' निघावयाची होती. अमळनेरच्या शाळेंतील हरिभाऊ मोहनी त्या यात्रेंत सामील होण्यासाठीं बाहेर पडले. साने सरहि विचारमग्न असत. हिंदुस्थानांतलें दुःख, दारिद्र्य नाहींसें व्हायचें तर परकी सत्ता गेली पाहिजे. स्वातंत्र्य आलें पाहिजे. स्वातंत्र्याचा संग्राम जवळ आला असतां निर्जीव पुस्तकें काय शिकवायचीं? जिवंत इतिहास बनत असतांना विद्यार्थ्यांना जुना इतिहास कशाला घोकावयाला लावायचें? दीनजनांचा कळवळा त्यांना स्वस्थ बसूं देईना. त्यानीं लढ्यांत सामील व्हायचें ठरविलें. आणि एक दिवस त्यानीं शाळेला, वसतिगृहाला रामराम ठोकला.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

 Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

जाण्याच्या दिवशीं तांबड्या शाईनें रात्रभर जागून त्यानीं छात्रालय दैनिकाचा अखेरचा अंक काढला. अमळनेरच्या सर्व मित्रांचें दर्शन घेतलें. त्यांच्या पायऱ्यांवर दोन दोन फुलें आपल्या कृतज्ञतेचें द्योतक म्हणून त्यानीं ठेवलीं.

आन्तरभारतीचा जन्म

गुरुजी शाळा सोडून गेले. शाळेचें संकुचित क्षेत्र सोडून व्यापक समाजशिक्षणाला ते लागले. त्यांची वाणी सर्वत्र घुमूं लागली. खानदेशांत ते फिरूं लागले. स्वातंत्र्याचें वातावरण निर्मूं लागले. आणि एक दिवस त्यांना अटक झाली. धुळ्याच्या जेलमधें ठेवलें आणि नंतर तेथून त्यांना त्रिचनापल्लीला नेण्यांत आलें. त्रिचनापल्लीला नानाप्रकारचे कैदी होते. तामीळ, तेलगू, मल्याळम्, कन्नड मातृभाषा असलेले कैदी तेथें होते. दाक्षिणेंतील भाषांशीं गुरुजींचा संपर्क तेथें आला. अमळनेरला गुजरातींशीं आणि बंगालीशीं त्यांचा संबंध आला होता. तत्त्वज्ञान मंदिरांतल्या चंद्रोदयानीं बंगालीशीं त्यांचा परिचय करून दिलाच होता. आतां दाक्षिणेंतल्या भाषाशीं, जनतेशीं संपर्क आला. भाषा वेगवेगळ्या पण भारताचें हृदय एकच आहे, सर्वत्र एकाच संस्कृतीनें भारत भारलेला आहे ह्याचें दर्शन तेथें त्यांना झालें. जर ह्या भाषांचा अभ्यास होईल, वेगवेगळ्या प्रांतांच्या चालीरीति एकमेकांस समजतील, एकमेकांच्या साहित्याचा अभ्यास होईल तरच हे दुरावलेले बंधु जोडले जातील. मग मराठी कानडी, गुजराती मराठी यांचे वाद नाहींसे होतील. मद्रासी माणसाचा महाराष्ट्रीय द्वेष करणार नाहीं, बंगाली महाराष्ट्रीयाला डाकू म्हणून हिणवणार नाहीं. पण

 CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

असे उदार शिक्षण देणारी संस्था ह्या भारतांत कोठें आहे ? रवींद्रांची 'विश्वभारती' भारताला विश्वाशीं जोडण्याचें थोर कार्य करीत आहे; पण आमची अंतर्गत जोडणी कशी व्हायची ? त्यासाठीं योजना हवी. त्यांच्या डोळ्यांसमोर अशा संस्थेचीं चित्रें दिसत. 'प्रांत भारती, आन्तरभारती'सारखी एकादी संस्था भारतांत असली पाहिजे असें त्यांना वाटे. त्यानीं तेथें कितीतरी मित्र जोडले. आणि सुटायचा दिवस आला. त्यांना कोणीतरी विचारलें:

"सुटल्यावर काय कराल ?"

"प्रेमधर्माचा, सत्यधर्माचा प्रचार करीन." ते सुटले पण सुटल्यावर तरी स्वस्थता कोठली ? पुन्हां प्रचार होताच. जेलमधें नाना विचार, नाना कल्पना स्फुरत. भारताच्या स्वातंत्र्यासाठीं जागृतीची केवढी आवश्यकता आहे. स्त्रिया, मुलेंहि स्वातंत्र्याच्या लढ्यांत पाहिजेत. पण त्यांना कसें आणायचें ? गांधीजीनीं तर सर्वांना येतां येईल अशा स्वरूपाची चळवळ काढली होती. पण त्यांना नवे विचार देऊन जागे कोण करणार ?

१९३२ साल

आणि १९३२ साल आलें. गांधीजी विलायतेंत राऊंड टेबल कॉन्फरन्सला जाऊन आले होते. त्यानीं तेथें अपूर्व कामगिरी बजावली. पण सरकारला गांधी–आयर्विन तह खटकत होता. साम्राज्यसरकार एका नंग्या फकिरापुढें नमलें ही गोष्ट त्यांना डांचत होती. तहाचीं कलमें मोडलीं जात होतीं. परंतु गांधीजींच्या आदेशाकडे डोळे लावून शांततेनें काम चालू होतें. गांधीजी येण्याच्या

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

 Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

सुमारास सरकारनें जवाहरलालजींना पकडलें. गांधीजींना भेटावयाचें व्हाइसरॉयनें नाकारलें. लढा आला. महाराष्ट्रांत वानरसेना उभ्या राहिल्या. त्यांच्यासाठीं स्फूर्तिदायक गाणीं तयार झालेलीं होतीं. प्रभातफेऱ्या, सायंफेऱ्या निघत होत्या. १९३० च्या जेलमधें गुरुजीनीं कांहीं पदें रचलीं होतीं. स्फूर्तिदायक ओजस्वी पदें, स्वातंत्र्याचा निर्धार व्यक्त करणारीं, प्रेरक पदें. त्यांच्या ओळींत पहा किती तेज, ओज आहे.

आम्ही मांडूं निर्भय ठाण, देऊं हो प्राण ॥ ध्रु० ॥
स्वातंत्र्य सुधेचें निजजननीला, घडवूं मंगल पान ॥
ही मंगल भारत भूमि
करूं स्वतंत्र निश्चित आम्ही
हा निश्चय अंतर्यामीं
मातृमोचना करूनि जगिं तिज, अर्पूं पहिलें स्थान ॥
स्वार्थाची करुनी होळी
छातीवर झेलूं गोळी
करूं मृत्यूशीं खेळीमेळी
मातृभूमिच्यासाठीं मोदें, करूं सारे बलिदान ॥

असा निश्चय ठायीं ठायीं व्यक्त होऊं लागला. स्वातंत्र्याच्या शिपायांची सेना उभी राहूं लागली. लहान थोर हीं गाणीं गावूं लागले. आणि हें दुसरें गाणें पहा किती सुंदर आहे.

स्वातंत्र्याचे आम्ही शिपाई, सुखवूं प्रियतम भारतमाई ॥
देशभक्तिचा सुदिव्य सोम

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

पिउनि करूं प्राणांचा होम
कष्ट हाल हें अमुचें भाई, सुखवूं प्रियतम भारतमाई ॥

धैर्याचा तो अभंग ढाल
त्यागाची तीं वस्त्रें लाल
निश्चय दंडा करीत राही, सुखवूं प्रियतम भारतमाई ॥

कळिकाळाला धक्के देऊं
मरणालाहि मारुनि जाऊं
चला यार हो करूं रणघाई, सुखवूं प्रियतम भारतमाई ॥

जाचकांच गरिबांना नुरवूं
झोपड्यांतूनि मोदा फुलवूं
मुक्त तयांना करूं लवलाहीं, सुखवूं प्रियतम भारतमाई ॥

अशी स्वातंत्र्यसेना सर्वत्र उभी राहावी म्हणून गुरुजी खटपट करीत होते. खानदेशांत संचार करीत असतांना ते पकडले गेले. त्यांना धुळें जेलमध्यें ठेवण्यांत आलें.

विनोबाजींचें दर्शन

धुळें जेल म्हणजे त्यावेळीं एक मोठी शाळा झाली होती. राष्ट्रीय शाळांतले शिक्षक, विद्यार्थी तेथें जमले होते. तेथें सहजीवनांतिल आनंद उपभोगावयास मिळत होता. धुळें जेलमध्यें त्या वेळीं तपोमूर्ति विनोबाजीहि होते. जेलरपेक्षां त्यांचा प्रेमाचा अधिकार प्रभावी ठरत होता. तेथें सानेसर फारच रमले. विनोबाजींनीं चक्कीचें काम सत्याग्रहींनीं घ्यावें असें सुचविलें. सत्याग्रही पुढें आले. साने ह्या चक्कीवाल्या तुकडींत होते. या वेळपर्यंत साने सरच होते. पण राष्ट्रीय

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

शाळांतून शिक्षकांना गुरुजी म्हणत. साने सर धुळे जेलमध्यें साने गुरुजी झाले. तेथें सत्याग्रही युवकांस साने गुरुजींनीं लळा लावला. दळावयाला येणाऱ्या युवकांना गुरुजी नाना गोष्टी सांगत. गुरुजींच्या गोष्टी ऐकायला मिळाव्यात म्हणून कितीतरी युवकांनीं चक्की मागून घेतली. आणि विनोबाजींचीं प्रवचनें व्हायचें ठरलें. दर रविवारीं गीतेच्या एकेका अध्यायावर एकेक प्रवचन. हा अपूर्व योग होता. विनोबाजी म्हणजे गीतेचे आचार्य. गीतेचा अभ्यास त्यांच्याइतका फार थोड्यांचा असेल. त्यांचीं प्रवचनें होत. सारे श्रोते भारावून जात. पण तो आनंद किती वेळ टिकणार? पुन्हा पुन्हा त्या आनंदांत अवगाहन कसें करतां येणार? गुरुजी त्या प्रवचनांना हजर असत. एका कोपऱ्यांत वही पेन्सिल घेऊन बसत. त्यांना जणुं अमृतच मिळालें. एकाग्रतेनें विनोबाजींची वाणी ते 'अक्षर' करीत असत. विनोबाजींचीं हीं अमर प्रवचनें गुरुजींच्यामुळें महाराष्ट्राला लाभलीं. विनोबाजींचे विचार साध्या सोप्या सरळ भाषेंत अत्यंत आत्मीयतेनें आणि जिव्हाळ्यानें, भक्तीनें आणि प्रेमानें गुरुजींनीं 'अक्षर' केलें. हीं प्रवचनें मराठीचें लेणें झालें आहे.

गुरुजींचे आदर्श त्रिमूर्ति

गुरुजींच्या जीवनांत त्यांनीं तीन व्यक्तींची आदर्श म्हणून स्थापना केली होती. रामकृष्ण परमहंस, रवींद्रनाथ आणि महात्मा गांधी. रामकृष्ण परमहंस म्हणजे चालतें बोलतें अद्वैत. सर्वधर्म समभाव हा त्यांचा जीवनाधार होता. संकुचितता अशा पुण्यपुरुषाजवळ कशी असणार? गुरुजीहि आपल्या जीवनांत जाति-धर्म निरपेक्षता अनुभवूं

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

पाहात होते. संकुचिततेंत ते गुरमरत. सर्वांभूतीं समभाव पाहण्यासाठीं ते तळमळत. त्यांना रामकृष्णांचें जीवन अनुकरणीय वाटे. आणि रवींद्र म्हणजे भारताची सौंदर्यशक्ति. रवींद्रांचें जीवन निसर्ग, तारे, वारे, भावना यांनीं ओतप्रोत भरलेलें. गुरुजींनाहि या गोष्टी प्रिय होत्या. आणि गांधीजी म्हणजे सेवामूर्ति. त्यानीं रोग्यांची सेवा केली, त्यानीं संडास साफ केले. त्यांना कोणतेंहि सेवाकार्य तुच्छ वाटलें नाहीं. भारतीय संस्कृतीच्या आत्म्याचें कृतिरूप गांधीजी. गुरुजींच्या ह्या तीन आदर्शमूर्ति. त्यांचा एक पराधीश हिस्सा आपण बनावें ही त्यांना तळमळ होती.

नाशिक जेलमध्यें

पुढें गुरुजी नाशिकच्या जेलमध्यें गेले. नाशिकला महाराष्ट्राच्या भावजगतांत अपार महत्त्व आहे. वानराशीं मैत्री करणारे प्रभु रामचंद्र बारा वर्षें येथें राहिले. ह्या वनवासांतील तपश्चर्येमुळेंच रावणाचा नाश झाला. रामरायाच्या पादस्पर्शानें पावन झालेला हा प्रदेश. गुरुजींच्या भावनापूर्ण मनाला नाशिक ही पुण्यभू वाटे. गुरुजींच्या मनांतील भावसिंधु नाशिकला उचंबळून येई. बर्गीचांत काम करतांना

तुझ्या धुळीमाजीं वाटे लोळणें सुखाचें
इथें पाय पावन फिरले रामजानकीचे ।।

म्हणून गुरुजी गहिंवरत. जमिनीवरची माती घेऊन ते आपल्या कपाळाला लावीत. नाशिकच्या जेलमध्यें त्यांच्या भावनांना जणूं भरती आली होती. त्यांच्या डोळ्यांसमोर आपली आई, भारतमाता आणि विश्वमाता उभ्या राहात. १९३३ साल उजाडलें. गुरुजींचे

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

 Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

डोळे मातेच्या स्मरणानें भरून येत. किती अनंत स्मरणें त्यांच्या मनांत येत. आपलें काम सांभाळून ते लिहूं लागले. भरलेलें हृदय ते हलकें करूं लागले. आईच्या प्रेमळ स्मृति ते लिहूं लागले. साडे-तीन दिवसांत जो रिकामा वेळ मिळाला त्यांत त्यानीं मराठी भाषें-तील अमर ग्रंथाची रचना केली. आपलें हृदय ते कागदावर उतरवीत होते. त्यांची " श्यामची आई " वाचली नाहीं असा दुर्भागी जीव महाराष्ट्रांत तरी नसेल. आईच्या थोर शिकवणीचें, सरळ, साध्या व सुंदर संस्कृतीचें एक करुण व प्रेरक कथात्मक चित्र त्यानीं रेखाटलें. आज हा मातृमहिमा गाणारा वेद घरोघर गेला आहे. अनेकांच्या जीवनांत त्या पुस्तकानें क्रांति केली आहे. ह्या पुस्तकानें ज्याचें हृदय आणि डोळे ओले केले नसतील असा मनुष्य सांपडणार नाहीं. नाशिक जेलमध्यें गुरुजींच्या प्रतिभेला जणूं बहर आला होता. ज्ञानेश्वरांनीं ३।। चरणांच्या ओवींत सारें जीवनशास्त्र भरलें. त्यांच्या-नंतर इतक्या छोट्या वाक्यांत, सोप्या भाषेंत क्वचित् कोणीं लिहिलें असेल. गुरुजींचीं वाक्यें लहान, सोपीं, सुटसुटीत. गुरुजीनीं आपल्या लिखाणानें मराठींत एक नवीन शैली निर्माण केली. श्यामच्या आई-नंतर त्यानीं धडपडणारीं मुलें ही त्रिखंडात्मक कादंबरी लिहिली. पत्रींतल्या किती तरी कविता त्यानीं याच वेळीं लिहिल्या. त्यांच्या हृदयाकाशांत दिसणारीं नाना दृश्यें त्यानीं रेखाटलीं. ध्येयाच्या नाना कल्पना त्यानीं अक्षरांतून चिरकालीन केल्या. त्यांच्या कविता म्हणजे त्यांचें हृदय प्रकट करणारी दुर्बीण.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

खरा धर्म कोणता तें सांगतांना ते म्हणतात—

खरा तो एकचि धर्म, जगाला प्रेम अर्पावें ।।
जगीं जे हीन अति पतित
जगीं जे दीन पददलित
तया जाऊन उठवावें । जगाला प्रेम अर्पावें ।।
प्रभूचीं लेकरें सारीं
तयाला सर्व हीं प्यारीं
कुणा ना तुच्छ लेखावें । जगाला प्रेम अर्पावें ।।
असे जें आपणापाशीं
असे जें वित्त वा विद्या
सदा तें देतचि जावें । जगाला प्रेम अर्पावें ।।
जयाला धर्म तो प्यारा
जयाला देव तो प्यारा
तयानें प्रेममय व्हावें । जगाला प्रेम अर्पावें ।।

गुरुजींचा आत्मा दीनांसाठीं तळमळे. देशांतून अन्याय, दारिद्र्य नाहींशी व्हायचीं असतील तर हा देह त्या कारणीं लागो असें त्यांना वाटे. भारताची सेवा करतां करतां हा देह पडावा अशी तळमळ त्यांना वाटे. आणि सहजच त्यांच्या लेखणींतून अशा ओळी स्रवत:

प्रिय भारत भू सेवा संतत करून ।
जाईन सुखानें मरून ।।

ह्या आपल्या ध्येयाचा त्यांना साक्षात्कार झाला होता. पण भारताची सेवा म्हणजे काय तें त्यांच्यापुढें स्पष्ट होतें. भारतमातेला

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

सुखवावयाचें म्हणजे येथली प्रजा सुखवायची. ते म्हणतात—

जोंवरी बंधु पोटभरी ना खाती
ना वस्त्र तदंगावरती।
जोंवरी त्यांना स्वपर मत्त रडविती
शतमार्गांनीं नागविती।
जोंवरी त्यांना ज्ञानकिरण ना मिळती
अंधारीं खितपत पडती।
तोंवरी न झोंप घेईन
अंतरीं जळत राहीन
सौख्यास दूर लोटीन

मी सुखवायां झटेन बांधव दीन। जाईन सुखानें मरून॥

ह्या निश्चयानें गुरुजी नाशिक जेलमधून बाहेर पडले. त्यांच्या मूळच्या प्रकाशी व्यक्तित्वाला या जेलयात्रेंत पैलू पडले. विनोबाजींच्या सान्निध्यानें त्यांच्या जीवनांत अधिकच उत्कटता आली.

स्त्री-गीतांचा संग्रह

गुरुजी बाहेर आले. त्यानीं देशाचा फाटका संसार सांवरतां यावा म्हणून आपला व्यक्तिगत संसार कोठेंच उभा केला नव्हता. जेलमधून सुटल्यावर काय करावयाचें तेंहि त्यानीं ठरविलें नव्हतें. ते बाहेर आले. जर्मनीमध्यें ग्रीम-बंधूंनीं जसें लोकसाहित्य एकत्र केलें तसें आपणाहि करावें असें त्यांच्या मनांत आलें. किती दंतकथा, किती काव्यें प्रचारांत आहेत. आणि त्यांना आपल्या आईची आठवण झाली. तिच्याजवळ एवढें ज्ञान कोठून आलें, एवढें प्रेम कोठून आलें?

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

स्त्रीजीवनाचा ग्रंथ कोणता ? कोठून त्यांना वात्सल्य, भ्रातृप्रेम, भ्राता-प्रेम मिळतें, कोठून अपार सहानुभूति मिळते ? निरक्षर स्त्रियांना कोठून हें सारें मिळतें ? आणि स्त्रियांच्या ओव्यांकडे त्यांचें लक्ष गेलें. हें अमर अपौरुषेय काव्य आपण एकत्र करावें, स्त्री—जीवनाचें दिव्यत्व नवभगिनींना दिसूं दे असें त्यांना वाटलें आणि ते फिरूं लागले. स्त्रियां-विषयीं गुरुजींमध्यें अपार आदर वसत होता. त्यांची निरहंकार निर्वि-कार मूर्ति पाहून मुक्या लाजऱ्या स्त्रिया बोलक्या होत. त्यांच्या नम्र-तेनें ते सहज त्यांच्याशीं समरस होत. जेथें जेथें जात तेथून आतां ओव्या जमा करूं लागले. त्यांतलें अमृततुल्य काव्य सर्वांना दाखवावें म्हणून रसपरिपोष लिहून त्यानीं त्या ओव्या प्रसिद्ध केल्या. तें सहृदय साहित्य त्यानीं जमा केलें. महाराष्ट्र साहित्याची केवढी सेवा त्यानीं केली. सुमारें दोन हजार ओव्या एकाद्या पुरुषानें जमा करणें ही सामान्य गोष्ट नाहीं. 'स्त्री—जीवन' म्हणून तें पुस्तक प्रसिद्ध झालें आहे.

मुलांची आई

१९३२ सालचा हा तेजस्वी पुरुष लोकांना कोठें दिसेना. गुरुजी कोठें गेले ? गुरुजीनीं 'स्त्री—जीवन' संग्रहीत केलें. गुरुजी प्रथमपासून मातृभक्त. ह्या मातृभक्तींतूनच त्यांच्यांत मातृभावना उदीत झाली होती. 'मातृभावना' म्हणजे दुसऱ्याचें जाणण्याची बुद्धि. लहान मूल बोलूं शकत नसतें. पण मातेला त्याला काय हवें नको कसें समजतें ? तिच्या मातृभावनेमुळेंच ती मुलाशीं समरस होते. तिला सारें समजूं लागतें. साहित्यसेवकाच्या दृष्टीनेंहि हा गुण महत्त्वाचा आहे. दुसऱ्याशीं समरस होतां आल्यावांचून खरें साहित्य

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

निर्माणच होऊं शकत नाहीं. दुसऱ्यांच्या सुखदुःखांचा आपल्या अंतःकरणांत जो अनुभव घेऊं शकतो तो साहित्यिक. गुरुजी हा अनुभव घेऊं शकत होते. त्या अनुभवांतूनच त्यांचें साहित्य निर्माण झालें आणि महाराष्ट्रीय जनमनाची त्यानें पकड घेतली. मातृभावना ही कार्यप्रेरक असते. साहित्यसेवकाला जेव्हां कार्यप्रेरणा होऊं लागते तेव्हां त्याच्यांत मातृभावना जागृत झाली समजावें. गुरुजींना मातृभक्तींतून ही मातृभावनेची देणगी मिळाली. आणि १९३४ सालनंतर ते अज्ञातवासांत असतांना पुण्याला कांहीं मुलांची आई बनून राहिले होते. खानदेशांतलीं कांहीं गरीब मुलें कॉलेजांत शिकत होतीं. गरिबी म्हणजे काय याचा गुरुजींना अनुभव होता. त्या गरीब विद्यार्थ्यांसाठीं गुरुजी स्वयंपाक करीत, त्यांचे कपडे धूत, भांडीं घाशीत. ही मुलांचीं कामें संपल्यावर जो वेळ रिकामा उरेल त्यांत वाचनलेखन करीत. याच काळांत त्यानीं भारतीय संस्कृति हा अप्रतिम ग्रंथ केवळ चार दिवसांत लिहिला. भारतीय संस्कृतीचे ते उपासक आहेत.

भारतीय संस्कृति

भारतीय संस्कृति हा मराठींतील एक अनुपम ग्रंथ आहे. अवतरणें वगैरेंनीं ग्रंथ भरून न टाकतां साधा, सोपा, सर्वांना समजण्यासारखा हा ग्रंथ लिहिला आहे. भारतीय संस्कृतीची जीवनाकडे पाहण्याची दृष्टि तेथें मांडलेली आहे. गुरुजी लिहितात—

" भारतीय संस्कृति हृदय व बुद्धि यांची पूजा करणारी आहे. उदार भावना व निर्मळ ज्ञान यांच्या योगानें जीवनास सुंदरता आण-

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

णारी ही संस्कृति आहे. ज्ञानविज्ञानास हृदयाची जोड देऊन संसारांत मधुरता पसरूं पाहणारी ही संस्कृति आहे. भारतीय संस्कृति म्हणजे कर्म–ज्ञान–भक्तीचा जिवन्त महिमा. शरीर, बुद्धि व हृदय यांना सतत सेवेंत झिजविण्याचा महिमा.

भारतीय संस्कृति म्हणजे सहानुभूति. भारतीय संस्कृति म्हणजे विशालता. भारतीय संस्कृति म्हणजे सत्याचे प्रयोग. भारतीय संस्कृति म्हणजे स्थाणु न राहतां सारखें ज्ञानाचा मागोवा घेत पुढें जाणें. जगांत जें जें कांहीं सुंदर, शिव व सत्य दिसेल तें तें घेऊन वाढणारी ही संस्कृति आहे. जगांतील सारे ऋषि महर्षि ती पूजील. जगांतिल सर्व संतांना ती वंदील. जगांतील सर्व धर्मसंस्थापकांना ती आदरील. मोठेपणा कोठेंहि दिसो, भारतीय संस्कृति त्याची पूजा करील व आदरानें व आनंदानें त्याचा संग्रह करील.

भारतीय संस्कृति संग्राहक आहे. संकुचितपणाचें वावडें असणारी संस्कृति आहे. आणि म्हणूनच भारतीय संस्कृति म्हणतांच माझे हात जोडले जातात. भारतीय संस्कृति म्हणजे मेळ. अशा प्रकारचा महान् मेळ निर्माण करून पाहणारी, सर्व मानवजातीचा मेळा मांगल्याकडे घेऊन जाऊं पाहणारी अशी जी ही थोर संस्कृति तिचाच लहानसा उपासक मला जन्मोजन्मीं होऊं दे, दुसरी कोणतीहि इच्छा मला नाहीं." गुरुजींची जीवनदृष्टि हीच होती. भारतीय संस्कृतीचे ते थोर उपासक होते. भारतीय संस्कृतीचें दर्शन महाराष्ट्राच्या प्रत्येक साक्षराला व्हावें अशा तळमळीनें त्यानीं हा दिव्य ग्रंथ लिहिला आहे. परमेश्वराला भारतीय संस्कृतीची मूर्ति घडवावीशी वाटली आणि त्यानें गुरुजींना भारतांत पाठविलें.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

 Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

फैजपूर काँग्रेस आणि निवडणुका

पुढें १९३६ साल आलें. महाराष्ट्रानें काँग्रेस माउलीला दिलेलें आमंत्रण स्वीकारण्यांत आलें होतें. काँग्रेस जास्तींत जास्त सामान्य जनतेंत किसानांत जावी असें गांधीजींना वाटत होतें. खेड्यांत काँग्रेस भरवावी अशी इच्छा गांधीजीनीं प्रकट केली. महाराष्ट्रानें खेड्यांत अधिवेशन भरवावयाचें नक्की केलें. फैजपूरची निवड झाली. गरीब महाराष्ट्रांत काँग्रेसमाय येणार होती. तिचें यथोचित स्वागत झालें पाहिजे. गुरुजी त्या वेळीं आजारी होते, अशक्त होते. पण ते आले. त्यांच्याजवळ अपार इच्छाशक्ति होती. तिच्या जोरावर शारीरिक अशक्तता बाजूला ठेवून आले. सर्वत्र घुमूं लागले. खेडोंपाडीं काँग्रेसचें नांव गेलें. महाराष्ट्रांतील कांहीं विघ्नसंतोषी मंडळींनीं व्यावहारिकतेचा पडदा घेऊन काँग्रेस यशस्वी होऊं नये, फैजपूरचें फजितपूर व्हावें म्हणून प्रयत्न केले. परंतु गुरुजी आणि महाराष्ट्रांतले अनेक कार्यकर्ते अपार श्रमले आणि फैजपूरचें फजितपूर न होतां फत्तेपूर झालें, पंढरपूर झालें. अधिवेशनाच्या दिवसांत गुरुजीनीं सफाई पथकांत काम केलें. फैजपूरला गुरुजीनीं स्वागताध्यक्ष व्हावें म्हणून आग्रह झाला पण त्यानीं नम्रपणें नाकारलें. परंतु तेथें स्वातंत्र्यज्योत त्यांच्या हस्तें आणण्यांत आली. फैजपूरमधेंच प्रांतिक निवडणुका काँग्रेसनें लढवाव्या असें ठरलें. "काँग्रेसच्या मागें सारा हिंदुस्थान उभा आहे हें जगाला एकदां दिसूं दे." या विचारानें निवडणुका लढवायचें ठरलें. गुरुजी पुन्हां काँग्रेसचें नांव घेऊन खेडोंपाडीं संचरूं लागले. काँग्रेसला महाराष्ट्रांत नाना विरोध. जातिवादी होते, भांडवलदार

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

धनिक होते आणि टिळकांचे अनुयायी म्हणविणारे केसरी कंपूचे लोकहि होते. पण महाराष्ट्रांत काँग्रेसनें जिंकली.

किसान-मजूर-विद्यार्थ्यांत कार्य

काँग्रेसनें गव्हर्नर मंत्रिमंडळाच्या कारभारांत ढवळाढवळ करणार नाहीं असें आश्वासन घेऊन मंत्रिमंडळें स्वीकारलीं. परंतु संपूर्ण स्वातंत्र्याचा लढा पुढें यायचाच होता. लोकांना निर्भय करावयाला संधि म्हणून मंत्रिमंडळें. पुढें प्रतिसरकार स्थापून सत्ता हातीं घ्यायची. त्यासाठीं विद्यार्थी-किसान-कामगार यांच्यांत जागृति हवी, त्यांच्या संघटना हव्यात म्हणून गुरुजीनीं त्या कार्याला हात घातला. काँग्रेसची शक्ति वाढावी म्हणून त्यानीं 'काँग्रेस' नांवाचें साप्ताहिक १९३८ च्या राष्ट्रीय सप्ताहांत काढलें. महाराष्ट्रांत जातिवाद उफाळूं पाहात होता. काँग्रेस लढ्यांत गुंतली असतां शाळाशाळांतून जातीय संघटनांना मोकळें रान मिळालें. विद्यार्थि-वर्ग स्वातंत्र्याच्या चळवळीपासून दूर जात चालला. गुरुजीनीं सेवादलें सर्वत्र निघावींत म्हणून खटपट केली. काँग्रेसचे एक लाख सभासद महाराष्ट्रांत व्हावेत म्हणून २१ दिवसांचें उपोषण केलें व त्या काळांत महाराष्ट्रभर स्वतः फिरून प्रचार केला. काँग्रेसपत्रांतून नाना विषयांच्या चर्चा ते करीत. गांधीजींच्या विधायक कार्याचा ते प्रचार करीत. १९३८ सालीं शेतकऱ्यांचीं पिकें बुडालीं. सारामाफी मिळेना. सरकारकडे मागण्या केल्या. पण उपयोग होईना. म्हणून १९३९ च्या स्वातंत्र्यदिनाच्या दिवशीं जळगांवला किसान मेळावा भरला. हा मेळावा अपूर्व होता. चाळीस पन्नास हजार शेतकरी जमले होते. पुढें युद्ध सुरू झालें. मंत्रिमंडळींनीं राजिनामे दिले. ब्रिटिश सरकारच्या डोळ्यांत काँग्रेस-

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

पत्र खुपूं लागलें. सरकारनें जामीन मागितला. अगोदरच काँग्रेस पत्र नुकसानींत चाले. जाहिराती घेत नसत. एक वेळ जेवून गुरुजी पैसे वांचवीत. आठवड्यांतून एकदां ह्या काँग्रेसपत्रासाठीं अमळनेरमध्यें भिक्षा मागत असत. जामीन भरणें शक्यच नव्हतें. पत्र बंद झालें. गुरुजी पुन्हां मोकळे झाले. गांधीजी विचारमग्न होते. वैयक्तिक सत्याग्रहाची चळवळ सुरू झाली होती. वातावरण तापत होतें.

चांदवड परिषद व अटक

नाशिक जिल्ह्यांतील काँग्रेसवादी युवकांची परिषद १९४० च्या नोव्हेंबरांत चांदवडला झाली. गुरुजी प्रचारार्थ जिल्हाभर हिंडले. देशाला दुहेरी धोका होता. बाहेरून परकी सत्ता आणि आंतून जातीय संस्था देश पोखरीत होत्या. सेवादल चळवळीकडे म्हणावें असें लक्ष कोणाचें नव्हतें. आणि उद्यां लढा आला तर ? महाराष्ट्र का इतर प्रांतांच्या मागें पडणार ? येथेंहि सेवादलें फुललीं पाहिजेत. चांदवडच्या युवक-परिषदेंत गुरुजींचीं तेजस्वी भाषणें झालीं. त्यानीं झाडूची दीक्षाहि तेथें जमलेल्यांना दिली. सेवादलाच्या ठरावावर गुरुजींचें अप्रतिम भाषण झालें. सेवादलाची स्फूर्ति घेऊन सर्वजण उत्साहानें परतले आणि गुरुजींच्या मागें वारंट लागलें. गुरुजी फिरत होते. वारंट घेऊन पोलीस त्यांच्या मागें जात. शेवटीं पेणला अटक झाली. नाशिकला आणलें. ८ दिवस तेथें लॉकअपमध्यें होते. त्या कालांत सेवादलाच्या तत्त्वज्ञानाचा प्रचार व्हावा म्हणून त्यानीं 'श्यामचीं पत्रें' म्हणून सुंदर पुस्तक लिहून दिलें. गुरुजींना सजा झाली. प्रथम नाशिकला आणि नंतर धुळ्याला त्यांना ठेवलें.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

'चले जाव' लढा

गुरुजी जेलमध्यें असतांनाच व्यक्तिगत सत्याग्रह स्थगित झाला आणि क्रिप्स साहेब येऊन गेले. तडजोड झाली नाहीं. लढा येणारसें वाटलें. गांधीजीनीं 'चले जाव' हाच तोडगा असल्याचें सांगितलें. गुरुजी आंत तळमळत. आपण लढ्यासाठीं काय करूं शकूं ? ते प्रार्थना करीत. आणि मुंबईला ए. आय्. सी. सी. भरली. गुरुजी येऊं शकले नाहींत, कारण ते अटकेंत होते. इकडे सगळे पुढारी बंदिस्त झाले. सर्वत्र निदर्शनें आणि लढा सुरू झाला. गुरुजींना स्थानबद्ध का करणार ? पण नाहीं. १० ऑगस्टला त्यांना सोडलें आणि ते अदृश्य झाले. अज्ञातवासांत राहून होईल ती मदत ते लढ्याला करूं लागले. पुस्तकें लिहून पैसे मिळवून द्यावे, कार्यकर्त्यांना स्वयंपाक करून जेवण घालावें, हें सारें काम ते करीत. १९४३ च्या एप्रिलमध्यें त्यांना अचानक अटक झाली. येरवड्याला व नाशिकला ते होते. १९४५ मध्यें सुटले. सुटल्यावर पुन्हां त्यानीं संचाराला आरंभ केला. चले जावच्या लढ्यांतील वीरकथांचें संकलन आणि संकीर्तन ते करूं लागले. महाराष्ट्रांतील हुतात्म्यांच्या आप्तांना ते भेटले व त्यांचें सांत्वन केलें.

पंढरपूरचें देऊळ खुलें झालें

विनोबाजींनीं त्या वेळीं कोठें म्हटलें, 'कधींपासून आम्ही अस्पृश्यता दूर करण्याबद्दल बोलत आहोंत, पण अजून कांहीं प्रगति नाहीं. दुसऱ्याला कमी लेखणारे स्वातंत्र्याला लायक कसे ठरतील ?' त्यानीं हरिजनकार्याचा हिशेब मागितला. गुरुजीनीं लिहिलें "आम्ही

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

 Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

आतां आमच्या मरणानें प्रचारिलें पाहिजे." विनोबाजी आपल्या एका मित्राला म्हणाले "पंढरपुरास जावें वाटतें. पण मंदिर अजून हरिजनास मोकळें नाहीं. तुम्ही जा. प्रचार करा." गुरुजींना त्या मित्रानें प्रचारांत मदत करायला या म्हणून लिहिलें. विनोबाजी गुरुजींना गुरुस्थानीं. त्यांची तळमळ जाणून गुरुजींनीं कार्तिकी एकादशीला प्राणान्तिक उपोषण जाहीर केलें. "पंढरपूरच्या मंदिराचे दरवाजे न उघडतील तर माझे डोळे मिटोत. हरिजनांना अजून आम्ही जवळ घेत नाहीं, स्वातंत्र्य आम्हांला कसें मिळणार? पंढरपूरचें मंदिर ही किल्ली आहे. तें मंदिर उघडलें कीं साऱ्या महाराष्ट्रांतील मंदिरें आणि हृदयमंदिरेंहि उघडतील असें त्यानीं लिहिलें. पण मित्रांनीं त्यांना विनविलें कीं, एकदम उपास करूं नका. संधि द्या. प्रचार करूं. महाराष्ट्राचें हृदय जागृत आहे. संधि दिली तर मंदिर खात्रीनें उघडेल. सहा महिने प्रचार करूं. तेथपर्यंत मंदिर न उघडलें तर उपास करा. आणि मंदिरप्रवेशाची महायात्रा सुरू झाली. गोव्यापासून नागपूर पर्यंत सेनापति आणि गुरुजी फिरले. सर्वत्र प्रचार त्यांनीं केला त्या वेळचें त्यांचें गाणें प्रसिद्ध आहे. त्यांना केवळ मंदिरांत हरिजन घेणें नको होतें, तर त्या निमित्तानें हृदयाचे दरवाजे उघडून सर्वत्र समानता यावी ही तळमळ होती.

घ्यारे, घ्यारे, घ्यारे हरिजन घरांत घ्यारे,
घरांत घ्यारे घरांत घ्या ॥
नको भेदभाव आतां
पुरे उच्च नीच वार्ता
व्हा बंधु बंधु सारे प्यारे ॥

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

करूं सकल जन स्वतंत्र
पुरे शिवूं नको हा मंत्र
करूं उघडीं सगळीं दारें यारे ॥
ध्या मंदिरांत बंधु
व्हा प्रेमस्नेहसिंधु
मग दास्य सर्व हारे ॥

आणि सहा महिन्यांच्या प्रचारानंतर महाराष्ट्राच्या मताची कदर करायला जेव्हां बडवे मंडळी तयार होत ना, तेव्हां वैशाखी एकादशीला गुरुजींचा उपवास सुरू झाला. तनपुरे महाराजांच्या मठांत उपवास सुरू होता. सर्व जनता विठोबाच्या मंदिराच्या ऐवजीं ह्या पांडुरंगाच्या दर्शनाला येऊं लागली. लोकांची ही भक्ति पाहून गुरुजीहि भावगंभीर होत.

माझ्या विठोबाच्या मूर्ति, प्रेमें भेटायाला येती ॥
त्यांचें घेऊं दे दर्शन, भावमय प्रेमपूर्ण ॥
त्यांना करीन मी प्रणाम, होईन मी पूर्णकाम ॥

हा अभंग म्हणून येणाऱ्यांना प्रणाम करीत. आणि ११ दिवसांनंतर दादासाहेब मावळंकराच्या मध्यस्थीनें मंदिराचे दरवाजे उघडले आणि बंदींत पडलेला विठ्ठल सर्वांना खुला झाला. केवळ कळसाचें दुरून दर्शन घेऊन समाधान मानणाऱ्या भाविक हरिजनांना विठोबाजवळ जातां येऊं लागलें. विनोबा, तुकडोजी, गाडगे महाराज यांच्यासारख्या संतांनाहि हे दरवाजे खुले झाले. गांधीजींनीं दिल्लीच्या एका प्रार्थना-प्रवचनांत गुरुजींच्यामुळें पंढरपूरचें देऊळ उघडलें म्हणून गुरुजींचें अभिनंदन केलें.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

गांधीजीः गुरुजींचा सूर्य

१९४७ सालीं स्वातंत्र्य आलें. फाळणी होऊन देश स्वतंत्र झाला. निर्वासितांचे प्रश्न निर्माण झाले. आणि १९४८ च्या जानेवारींत गांधीजींची हत्या झाली. गुरुजींच्यावर गांधीहत्येचा अपार परिणाम झाला. गांधीजी म्हणजे गुरुजींचा जीवनसूर्य होता. गुरुजींच्या जीवनांत गांधीहत्येनें अंधार पडला. त्यांना जीवन असह्य वाटूं लागलें. एका महाराष्ट्रीयानें ही हत्या केल्याचें समजलें तेव्हां तर त्यांना अपार दुःख झालें. ह्या पातकाचें प्रायश्चित्त महाराष्ट्रानें घेतलेंच पाहिजे. महाराष्ट्रांतला द्वेषगरळ नाहींसा झाला पाहिजे. जातिवाद गेला पाहिजे म्हणून गुरुजीनीं महाराष्ट्राच्या जीवनशुद्धीसाठीं २१ दिवसांचें उपोषण केलें. याच काळांत 'जातीयता नष्ट करा'च्या घोषणेनें त्यानीं सारा महाराष्ट्र दुमदुमविला. गांधीजींच्या कार्याचें स्मरण देण्यासाठीं त्यानीं 'कर्तव्य' नांवाचें दैनिक सुरू केलें.

साधना

१९४८ च्या १५ ऑगस्टला गुरुजीनीं साधना नांवाचें आपलें साप्ताहिक सुरू केलें. आपल्या निवेदनांत त्यानीं लिहिलें—

"स्वराज्य आलें. गांधीजी मागील वर्षी म्हणाले "स्वराज्य आलें म्हणतात. मला तें दिसत नाहीं." भाऊ भावाचा गळा कापीत आहे. हें का स्वराज्य? स्वराज्य म्हणजे का माणुसकीचा अस्त? संस्कृतीला तिलांजलि? स्वराज्याच्या महान् साधनानें आपणांस स्वातंत्र्य फुलवावयाचें आहे, संस्कृति समृद्ध करावयाची आहे. त्यासाठीं अखंड साधना हवी. जीवनाच्या सर्व क्षेत्रांत, सर्व व्यवहारांत

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

साधकाच्या वृत्तीनेंच वागण्याची धडपड केली पाहिजे. यालाच पुरुषार्थ म्हणतात.

येथें अनेक प्रांत, अनेक भाषा, अनेक जातिजमाति, अनेक धर्म यांचा संगम आहे. आज जर खरी संस्कृति वाढवावयाची असेल तर मिळतें जुळतें घेऊनच वागावें लागेल. वैराचा अभाव आणि विषमता नसणें हीं रामराज्याचीं दोन लक्षणें आहेत. स्वराज्याचीं हीं दोन्ही लक्षणें आपण पूर्णपणें सिद्ध केलीं पाहिजेत. " आणि त्यांचें साधना साप्ताहिक सर्वत्र सहृदयता, गरिबांविषयींचें प्रेम फैलावीत होतें. देशांतील नाना प्रश्नांची माहिती त्यांत यावयाची. गुरुजींच्या गोष्टी येत. मुलांसाठीं 'मुलांच्या मेळाव्यांत' गुरुजी येत. सुंदर पत्रांची मेजवानी तेथूनच मिळाली. 'आन्तरभारती'चा परिचय त्यांतून झाला. कितीतरी थोरांचे वाढदिवस साधनेनें साजरे केले. भारतमातेशीं तेथें भेटहि होई. महाराष्ट्राच्या जीवनांत मांगल्य फुलविणारी त्यांची साधना होती.

आपल्या जीवितकार्याविषयीं त्यानीं लिहिलें आहे: " लिहिणें हा माझा थोडासा स्वधर्म आहे. परंतु ती माझी जीवनव्यापी वृत्ति नाहीं. लेखणीच्या लालित्यापेक्षां मी झाडूच्या लालित्याचा उपासक आहें. मी साधना चालवितों. कांहीं विचार जनतेंत जावे अशी तहान वाटते म्हणून. मी ती साहित्यसेवा म्हणून करीत नसून लहानशी जीवनसेवा करीत आहे. "

आणखी एका ठिकाणीं त्यानीं लिहिलें आहे; " मी जीवनाचा नम्र उपासक आहें. सभोंवतालचा सारा संसार सुखी नि समृद्ध व्हावा, ज्ञानविज्ञानसंपन्न नि कलामय व्हावा, सामर्थ्यसंपन्न नि

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

प्रेममय व्हावा हीच एक मला तळमळ आहे. माझें लिहिणें वा बोलणें, माझे विचार वा माझी प्रार्थना या एकाच ध्येयासाठीं असतात.''

साने गुरुजी हे व्यक्ति नव्हते. गांधीजींच्याप्रमाणें त्यांचें जीवन संस्थागताहि नव्हतें. साने गुरुजी म्हणजे केवळ पार्थिव देह तर नव्हेच कारण इतके लोक 'साने गुरुजी अमर रहेंगे' असें उगीच ओरडत नव्हते. मग साने गुरुजी म्हणजे काय ? गांधी टोपी, खादीचें धोतर, नेहरू शर्ट, पायांत साध्याच चपला, हातांत एक कांठोकांठ भरलेली पिशवी अशा वेषांतलें गुरुजींचें दर्शन आतां आपल्याला होणार नाहीं. गुरुजी म्हणजे जीवनाकडे पाहण्याची एक भारतीय दृष्टि होती. भारतीय जीवन–दृष्टीचा सहिष्णुता हा आत्मा आहे. गुरुजींच्या इतकी सहिष्णुता, दुसऱ्याचें जाणून घेण्याची वृत्ति, फारशी कोठें आढळणार नाहीं. प्रेसमधल्या कामगाराला त्यानीं पत्रांतून लिहिलें '' तुम्हां सर्वांविषयीं जणूं मला जवळचें नातें वाटतें. तुम्हांला कधीं कोणाला त्रास होऊं नये, कोणाचें मन दुखूं नये, कोणाला आपण केवळ नोकर असें वाटूं नये असें मला वाटत असतें.'' ह्या परमतसहिष्णुतेंतूनच गुरुजींची गुणग्राहकता कोणालाहि कधींहि हार न जाणारी उपजत असे. डावपेंचाच्या राजकारणांत प्रतिपक्षी कधींहि करीत नाहीं अशा गोष्टी ते बिनदिक्कत करीत. आदिवासींच्या कार्याबद्दल लिहितांना बाळासाहेबांचा ते गौरवानें उल्लेख करीत आणि वल्लभभाईंच्या वाढदिवशीं भारताच्या पोलादी पुरुषा म्हणून अभिवादन करीत. ही उदारतेची गुरुजींची दृष्टि होती. त्यामुळेंच त्यांची वृत्ति पक्षातीत होती. पक्षाला पाठिंबा दिला तरी ते पक्षातीत वृत्तीचेच होते. गुरुजींचा सेवाभाव अतुल होता. दिखाऊ सेवा त्यांना आवडत

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

नसे. सहजप्राप्त सेवेंत त्यांना आनंद वाटे आणि ती सेवा सहज त्यांच्या हातून होत असे. मेघाभुवन ते स्वतःच्या हातानें झाडीत. तिथला संडास मोरी ते साफ करीत. खोलींतले कोणी आजारी पडले कीं त्याची शुश्रूषा करीत आणि त्याला आणि इतरांनाहि प्रेमानें जेवण करून घालीत. चहा पिऊन कपबशा तशाच पडलेल्या दिसल्या कीं सहज त्या ते विसळून ठेवीत. स्वतःचे कपडे दुसऱ्याला धुवावयाला त्यानीं कधीं दिले नाहींत. स्वतःचे कपडे स्वतःच धूत. जेवणानंतर स्वतःचें ताट स्वच्छ करून ठेवीत. गुरुजींची गांधीजींवर आणि त्यांच्या कार्यावर अपार निष्ठा होती. मुंबईत असले कीं ते तकलीवर व चरख्यावर नित्ययज्ञ म्हणून सूत काढीत. परिश्रमाची प्रतिष्ठा त्यांच्या मनांत असे. श्रमणाराला त्यांच्या मनांत मोठें स्थान असे. गुरुजींच्या इतका भावनात्मक ओलावा क्वचित्‌च कोठें सांपडेल. गुरुजी सद्‌भाव–सिंधु होते. त्यांचें मन अद्वैताचा अनुभव घेण्यासाठीं धडपडत असे. एकनाथांच्या सारखी त्यांची स्थिति होती:—

सहज कर्में झालीं तीं ब्रह्मार्पण
जन नोहे अवघा हा जनार्दन ॥

त्यांना जन म्हणजे अवघा नारायण वाटे.

विनोबाजी व सेनापति

गुरुजींच्या जीवनांत ज्यांना अत्यंत आदरणीय स्थान आहे अशा या महाराष्ट्रांतील दोन विभूति आहेत. विनोबाजींचा आणि गुरुजींचा संबंध धुळ्याच्या जेलमध्यें आला. जणूं अनेक जन्मींचे आपण सोबती असें त्यांना वाटे. गुरुजी दुरून प्रकाश घेत, प्रत्यक्ष जवळ जात नसत.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

त्यांच्या संकोची स्वभावानें ते दूर दूरच राहात. विनोबाजी त्यांना नेहमीं बोलावीत. गुरुजी लिहीत. " मी वर्ध्याला येईन, परंतु तुमच्या न कळत तुम्हांला पाहीन व निघून जाईन. " आणि गुरुजींच्या भेटीची विनोबाजींना तळमळ वाटे. ते पत्र लिहीत. गुरुजींना वाटे विनोबाजींना काय लिहावयाचें ? ते उत्तर पाठवीत नसत. एकदां विनोबाजीनीं त्यांना लिहिलें. " दुसऱ्याला आपल्यासाठीं ताटकळत ठेवणें ही हिंसाच आहे. " तरी गुरुजींचें उत्तर नाहीं. मग विनोबाजीनीं कोरेंच पत्र पाठविले. त्यावर फक्त लिहिलें " विनोबांचे सप्रेम प्रणाम. " पत्र गुरुजींना पोंचलें. चांगदेवाचें कोरें पत्र गुरुजीनीं ज्ञानेश्वरानीं जसें वाचलें तसें विनोबाजींचें हें कोरें पत्र वाचलें आणि त्यांना उत्तर पाठविलें. १९४० च्या वैयक्तिक सत्याग्रहानंतर विनोबाजी सुटले. त्यानीं गुरुजींना धुळ्याच्या तुरुंगांत एक भावस्पर्शी पत्र पाठविलें होते. त्यानीं लिहिलें;

" श्री गुरुजी,

तुम्ही बहुधा अजून मंदिरांत असाल. आम्हांला सध्यां मंदिरांतून धक्के मारून बाहेर काढण्यांत आलें आहे. पाहूं त्याचें काय करायचें तें. तुमचें स्मरण किती वेळां आणि किती तीव्रतेनें होतें तें शब्दांत कसें लिहावें ?....तुमचीं आमचीं हृदयें एकरूप आहेत. अनेक जन्मांचे आपण सोबती आहोंत. कसलेहि भेद—कल्पनेचे, काळाचे आणि स्थळाचे—आपणांस अलग करूं शकत नाहींत. मग भेटीची तळमळ कशाला ? पण कधीं कधीं होते खरी. आणि हीच माझी मानवता. दुर्बळ पण सरळ, प्रेमळ आणि प्रांजळ..... "

गुरुजींना विनोबाजींचें प्रेम हा थोर अनुग्रह वाटे. गुरुजींच्या

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

साधनेचें "विनोबाजींची पावन वाणी" हें खास सुंदर असे. महाराष्ट्राला विनोबाजींचा परिचय गुरुजीनीं करून दिला. मृत्यूपूर्वी निरवानिरवीचीं जीं पत्रें गुरुजीनीं लिहिलीं आहेत, त्यांत त्यांचे अखेरचे शब्द "पू. विनोबाजींचें स्मरण" हे आहेत. इतकी अपार श्रद्धा त्यांची विनोबाजींवर होती.

सेनापतींच्या विषयीं त्यांना असेंच प्रेम आणि आदर. सेनापतींच्या समग्र ग्रंथाला गुरुजीनीं फार सुंदर प्रस्तावना लिहिली. प्रस्तावना लिहिण्यासाठीं "आंघोळ करून सारे खळमळ दूर करून" ते बसले. आणि १९४० मधली गोष्ट आहे. डिसेंबरमध्यें गुरुजींना अटक करून नाशिकला आणलें. सेनापति अटकेंतच होते. पण डोकेंदुखीनें हॉस्पिटलमध्यें पडून होते. गुरुजी त्यांना भेटावयाला गेले. जाऊन गुरुजीनीं सेनापतींचे पाय धरले. सेनापति लगेच उठून बसले. ती दोन पांडुरंगांची भेट अजून डोळ्यांपुढें उभी राहते. गुरुजींची नम्रता आणि सेनापतींचा जिव्हाळा तेथें दिसला.

"आपल्या घरीं चाललांत का?" सेनापतीनीं विचारलें.

"हो" गुरुजी म्हणाले.

"बी क्लास मागा."

"तात्या, तुम्ही कां नाहीं मागत?"

"मी मागून काय करूं? माझा वेळ सी क्लासच्या मित्रांबरोबर पटकन् जातो. तुम्हांला बी क्लास मिळाला तर तुम्ही कांहीं लिहाल तरी." आणि गुरुजी जेलमध्यें गेले. नंतर पुढें पंढरपूरच्या विठ्ठल मंदिराचे दरवाजे हरिजनांसाठीं उघडावे म्हणून गुरुजीनीं उपवास जाहीर

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

 Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

केला. सेनापतींना दुःख झालें. त्यानीं सहा महिन्यांची मुदत मागून घेतली. आणि [illegible]-प्रवेशाच्या प्रचारासाठीं गुरुजींच्याबरोबर ते गोव्यापासून नागपूरपर्यंत सर्वत्र फिरले. गुरुजींच्याविषयीं सेनापतींना अपार जिव्हाळा होता.

गुरुजींच्या जीवनांत ह्या थोर व्यक्ति एकदेम आल्या आणि त्यांचें हृदय त्यांनीं काबीज केलें. गुरुजींची ह्या थोरांच्या स्मरणानें समाधि लागे. सेनापति, विनोबाजी, गांधीजी यांचे फोटो गुरुजींसमोर ठेवले कीं, गुरुजी ते फोटो पाहण्याऐवजीं डोळे मिटून त्यांवर हात ठेवून त्या थोरांच्याजवळ जणूं जाऊन येत. फोटोच्या बाह्य सौंदर्यापेक्षां त्यांच्या हृदयाला त्या थोरांच्या थोरवीचेंच दर्शन होत असे.

गुरुजी भावनाप्रधान होते

गुरुजींच्या मनांत भावनांच्या अनेक ऊर्मी उसळत. ह्या भावनांच्या लाटांवर गुरुजींचें जीवन चाले. पण गुरुजींच्या भावना ह्या तरंग स्वरूपाच्या नसत. घटकाभर तरंग उठला पुन्हां गेला असें नसे. भावना म्हणजे परिनिष्ठित बुद्धि. त्यांच्या भावना गांधीजीनीं एके ठिकाणीं म्हटल्याप्रमाणें "Condensed Thoughts" अशा स्वरूपाच्या होत्या. त्यामुळें त्या भावना विचारापेक्षां भिन्न नसत. त्या बुद्धीचेंच व्यक्त स्वरूप असत. त्यांच्या बुद्धीचा आणि हृदयाचा निर्णय नेहमीं एकच असे. त्यामुळें गुरुजींच्या प्रत्येक बोलण्या-लिहिण्यामध्यें एकप्रकारचें सामर्थ्य प्रतीत होई. त्यांच्या लिहिण्यामागें आत्मार्पणाचा निश्चय प्रत्ययास येई आणि तो काम करून जाई.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

गुरुजींचें साहित्य

विनोबांनीं म्हटलें आहे "साहित्य तर त्यानीं [illegible] पार लिहून ठेवलें आहे. तरी पण ते स्वतःला साहित्यिक समजत नसत. लिहिल्याशिवाय, बोलल्याशिवाय राहवत नसे म्हणून ते लिहीत, बोलत. दीनांचा कळवळा त्यांच्याकडून साहित्य वदवीत होता." गुरुजींच्या साहित्यांत, यामुळेंच टीकाकारांना कलातंत्र आढळलें नाहीं तरी गुरुजींच्या भाषेंत एकप्रकारचें ओज होतें आणि तंत्रापेक्षां हें ओजच जनमनाची पकड घेई. जनता तंत्राकडेच कधीं पाहात नाहीं. तिला ओजाचा प्रत्यय आला कीं ती तें साहित्य डोक्यावर घेऊन नाचते. गुरुजींच्या कविताहि ओबडधोबड कधीं असत. परंतु त्यांच्यांत अपार प्रेरकशक्ति असे. तो त्यांच्या हृदयाचा उद्‌गार असे आणि त्यांच्या हृत्तंत्रीची तार छेडली गेली कीं महाराष्ट्रांतील लाखों तरुणांच्या हृदयांत त्याच सुरांचे प्रतिध्वनि उमटत. गुरुजींच्या कविता लोकप्रिय ठरल्या आणि तरुणांच्या जिभांवर खेळूं लागल्या ! याचेंहि कारण हेंच आहे. त्यांच्या लेखणीइतका प्रसाद दुसऱ्या कोणत्याहि कवीच्या काव्यांत आढळत नाहीं. त्यामुळें संगीताच्या दृष्टीनें नादमाधुर्य कमी असलें तरी त्यांच्या कविता लोकप्रिय झाल्या. भावात्मकता त्यांच्याइतकी फारच थोड्या कवींत आढळेल. ज्ञानेश्वरानीं आपल्या पसायदानांत दर्शविल्याप्रमाणें त्यांच्या साहित्याचा उद्देश होता.

आतां विश्वात्मकें देवें
तेणें वाग्‌यज्ञे तोषावें
तोषोनि मज द्यावें । पसायदान हें ॥

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri.

जें खळांची व्यंकटी सांडो
तयां सत्कर्मीं रति वाढो
भूता परस्परें जडो । मैत्र जिवांचे ॥
दुरितांचें तिमिर जावो
विश्व स्वधर्म सूर्ये पाहो
जो जें वांछिल तो तें लाहो । प्राणीजात ॥

गुरुजींच्या साहित्यामागची हीच भूमिका आहे.

गुरुजींचें साहित्यांतलें स्थान कोणतें तें ' माझी मायबोली आली आज माहेराला' या कवितेंत कवि सोपानदेवानीं सांगितलेंच आहे.

आधुनिकांमध्यें एक राष्ट्रसंत थोर ।
पंढरीच्या पाषाणांना फोडितो पाझर ॥
साने गुरुजींचा लळा कटिसी मेखला।
माझी मायबोली आली आज माहेराला ॥

गुरुजीनीं जी साहित्यसंपदा महाराष्ट्राला अर्पण केली त्यांत युवकांना–बालांना जीवन परिपुष्ट करावयास उपयुक्त असेंच साहित्य बरेचसें आहे. गुरुजींना देवाचा ध्यास होता. त्यांना हिमालयांत जावेसेंहि पूर्वी वाटत असे. एकदां त्यानीं विनोबाजींना लिहिलें " कोठेंतरी देवासाठीं बसावें असें मनांत येतें. " विनोबाजीनीं लिहिलें " कोठें जाणार ? तीर्थांचें पावित्र्याहि राहिलें नाहीं आणि देव सभोंवतीं कां नाहीं ? आजुबाजूचे लोक म्हणजे परमेश्वर ही भावना नसती तर मी कधींच हिमालयांत निघून गेलों असतों. " आणि गुरुजीनीं आपल्या आसपास परमेश्वर शोधला. त्यांना दीन

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

दलितांत, श्रमणाऱ्या किसान मजुरांत, स्त्रियांत तो परमेश्वर दिसला. लहान मुलांतला परमेश्वर त्यानीं पाहिला. आणि [illegible]

करी मनोरंजन जो मुलांचें [illegible]
जडेल नातें तयाचें ॥

असें गुणगुणत त्यानीं लेखणी हातांत धरली आणि महाराष्ट्र-शारदेच्या मंदिरांत चाललेली मुलांची अक्षम्य उपेक्षा थांबविली. मराठी भाषेंतल्या बाल–कुमार साहित्यांत गुरुजींचें स्थान एकमेवाद्वितीय असें आहे. मराठीच्या उपेक्षित बालकांचीं जीवनें परिपुष्ट करणारें तेजस्वी वाङ्मय गुरुजींनीं दिलें आहे. महाराष्ट्राच्या मुलांवर त्यांचे अपार उपकार. पण मातेचे का कोणी उपकार मानतो ?

लोकशाहीचे संरक्षक

गुरुजी खरे लोकशाहीवादी होते. कारण ते इतरांना स्वातंत्र्य देणारे होते. आपल्या मित्रांना ते नेहमीं म्हणत. "तुम्ही कसलेरे लोकशाहीवादी. तुमच्याजवळ सगळी लादालादी. मी खरा लोकशाही-वादी आहें. मी स्वातंत्र्य देणारा आहें." आणि गुरुजी खरे लोक-शाहीवादीच नव्हे तर लोकशाहीचे संरक्षक होते. मांगल्यनिष्ठा हा त्यांचा स्वभाव असल्यानें ते माणसाच्या चांगुलपणावर नेहमीं विश्वास ठेवीत. मनुष्य अखेर मंगल ओळखतो, मांगल्याकडे जातो ही श्रद्धा ज्याच्याजवळ नसते तो लोकशाहीचा उपासक होऊं शकत नाहीं. लोकशाही म्हणजे निवडणुका नव्हेत. लोकशाही म्हणजे ही मूल-भूत मांगल्यनिष्ठा. ह्या मांगल्यनिष्ठेतूनच सर्वांना समाजांत सारखें स्थान असावें, सामाजिक व आर्थिक विषमता समाजांत असूं नये ही तळमळ निर्माण होते. गुरुजींच्यामध्यें ही तळमळ खूप दिसून येते

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri



गुरुकुल हस्ताक्षर

સાંજનાનાં દૃશ્યો અનેનો અનન્ત
દેખાવો દેખાતો! ઢગલે ઢગલ આકાર
દેખાતાનાં! ક્ષણોન ક્ષણો ક્ષણોન
ધોવણારૂં સપને! ક્ષણોન ક્ષણોને
પોષાકવ બદલે ને ને ને

 Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

आणि त्यामुळेंच ते लोकशाहीचे संरक्षक होते. हिंदुस्थानांत लोकशाहीचा व्यापक प्रयोग आतां व्हावयाचा आहे. गुरुजींजवळ असलेली मांगल्यनिष्ठा, उदारता, सहिष्णुता आपण जोपासीत आणली तर येथें लोकशाहीचा विकास होईल. लोकशाही कायम होईल. यासाठीं आवश्यक ती पक्षातीतता गुरुजींजवळ होती. तसें पाहिलें तर गुरुजी राजकारणी नव्हतेच. ते अखेरपर्यंत शिक्षकच होते. त्यांच्या जीवनाकडे पाहिलें कीं ते गुरुजी होते हीच भावना दृढ होते.

विद्यार्थी-शिक्षकांसाठीं उपवास

स्वातंत्र्य आलें, पण गरिबांची गरिबी दूर झाली नाहीं, समानतेची स्थापना झाली नाहीं. गुरुजी या गोष्टीमुळें तळमळत. कधीं रागावून टीका करीत. त्यांची दलितांविषयींची आत्मीयता त्यांना स्वस्थ बसूं देत नसे. जर देशांतलें दुःख, दारिद्र्य दूर करतां येत नसेल तर जगून काय करावयाचें? त्यापेक्षां ह्या गोष्टींच्या निषेधार्थ मरून जावें असें त्यांना वाटे. परंतु ते काम करीत राहिले. १९४९ च्या च्या अखेरीस विद्यार्थी-शिक्षकांना राजकारणांत भाग घ्यावयास मनाई करणारा एक हुकूम मुंबई सरकारनें काढला. विद्यार्थी-शिक्षकांच्या स्वातंत्र्यावर घाला घालणाऱ्या ह्या हुकुमाच्या निषेधार्थ गुरुजीनीं २४ डिसेंबरपासून उपवास करण्याचा आपला निर्धार जाहीर केला २२ डिसेंबरला सरकारनें आपला हा हुकूम परत घेतला. त्यामुळें गुरुजींचें उपोषण टळलें.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

आन्तरभारतीचा प्रचार

भाषावार प्रांतरचनेचा प्रश्न लांबणीवर पडला, त्यामुळें प्रांतांच्या सीमांविषयीं वाद निर्माण होऊं लागले. प्रांताप्रांतांतून सद्भाव नाहींसा होत चालला. मुंबई-डांग भागांत महाराष्ट्रीय-गुजराती तेढ वाढूं लागली. तिकडे बेळगांव, कारवारकडे कन्नड-महाराष्ट्रीय एकमेकांचा द्वेष करूं लागले. हें प्रान्तीयतेचें विष भारतीय स्वातंत्र्याला धोका ठरणार अशी भीति वाटूं लागली. प्रान्ताप्रान्तांत सद्भाव असला पाहिजे, तरच भारत सामर्थ्यसंपन्न होईल. त्यासाठीं एकमेकांच्या भाषा शिकल्या पाहिजेत, चालीरिती समजून घेतल्या पाहिजेत, परस्पर परिचय वाढला पाहिजे, विविधतेंतील एकता अनुभवली पाहिजे, असें गुरुजींना वाटूं लागलें. आणि हा परस्पर सद्भाव वाढावा म्हणून 'आन्तरभारती'ची स्थापना मुंबईजवळ करावयाचें त्यानीं निश्चित केलें. त्यासाठीं लोकमत तयार करावें व पैसा उभारावा म्हणून त्यानीं प्रचाराला सुरुवात केली. बेळगांव, धारवाड, गदग, हुबळी, कारवार भागांत ते फिरून आले. थोडाफार पैसाहि घेऊन आले.

परंतु ते अस्वस्थ होते. समाजाला आपण आपल्या जीवनानें सांवरण्याचा प्रयत्न करीत आहोंत, पण हा प्रयत्न पुरा पडत नाहीं; आतां आत्मार्पणानेंच समाजाला इषारा देऊन योग्य मार्गाला लावलें पाहिजे असें त्यांना वाटलें आणि आपली जीवन–ज्योत त्यानीं ११ जूनला मालवली. गुरुजी आतां देहरूपानें आपल्यांत नाहींत. पण त्यांची स्मृति आपल्याला प्रेरणा देत राहील. त्याचबरोबर त्यानीं आपल्याला मार्गदर्शनासाठीं आपलें साहित्यहि ठेवलें आहे.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

On who touches the book touches the heart.

जो ग्रंथांना हात लावील तो हृदयाला हात लावील. अशा अर्थाचें एक इंग्रजी वाचन आहे. गुरुजींच्या वाङ्मयासंबंधी हेच म्हणतां येईल. त्यांचें वाङ्मय हाच त्यांचा संदेश आहे. त्या संदेशानुकूल जर आपण आपलीं जीवनें रचूं तर गुरुजींच्या आत्म्याला समाधान लाभेल.



CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri



CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

किंमत ६ आणे

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar